लोकमत

# कवितेच्या माध्यमातून वैविध्यपूर्ण जीवन अनुभवांचे सादरीकरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी :** मानवी जीवनातील नातेसंबंधांवर भाष्य करणाऱ्या कथा आणि रंगतदार कवितांच्या माध्यमातून येथे 'साहित्य मंच' हा कार्यक्रम पार पडला. कथा व कविता वाचनांच्या माध्यमातून लेखक, कवींनी आपले वैविध्यपूर्ण जीवन अनुभव यावेळी विशद केले.

शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात बा. बा. कोटंबे, मिलिंद जाधव यांनी कथा वाचन केले. तर मोहन कुलकर्णी, केशव खटिंग, संतोष नारायणकर यांनी कविता सादर केल्या. यावेळी प्राचार्य डॉ. बी. यू. जाधव, डॉ. आसाराम लोमटे यांची उपस्थिती होती. प्रारंभी कोटंबे यांनी 'पडझड' या कथेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील कुटुंब व्यवस्थेतील पेच सांगितला तर मिलिंद जाधव यांनी 'खुलासा' या कथेतून एका मध्यमवर्गीय कुटुंबातल्या नाट्यावर प्रकाश टाकला. मोहन कुलकर्णी यांनी यावेळी 'बंद खिडकीच्या आत', 'पाऊस, काही टिपणं', 'देह सजवायचा' या कविता सादर केल्या. कवी केशव खटिंग यांनी यावेळी 'मॉडगेज', 'दिस कडूशार झाले', 'लेक म्हणजे कवितेचे प्रत्यक्ष रूप' या कविता सादर केल्या. कवी संतोष नारायणकर यांनी 'देव परीक्षा घेतात', 'कपड्यांचा संदुक', 'दोन पाय, दोन हात' या कविता सादर केल्या. यावेळी केशव वसेकर, रेणू पाचपोर, सरोज देशपांडे, तुकाराम खिल्लारे, राजेंद्र गहाळ, प्रा. भगवान काळे, गंगाधर गायकवाड आदींची उपस्थिती होती.